# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१५ – १६

## **राष्ट्रीय छात्र सेना विभाग**

प्रभात पुणे, सोमवार, दि. २२ जून २०१५

### राजगुरुनगरला एनसीसीच्या विद्यार्थ्यांनी घेतले योग प्रशिक्षण

**राजगुरुनगर, दि.२१ (वार्ताहर)** - हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात जागतिक योगादिनाचे ओचित्य साधून एनसीसीच्या विद्यार्थ्यांसाठी योगप्रशिक्षण शिबिर, प्रात्याशिक, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांसाठी योगशिबिर, व्याख्यान आदि विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व महात्मा गांधी विद्यालयाच्या सुमारे १०० सिग्नल व एयर एन.सी.सी. विद्यार्थ्यांनी योग प्रत्यक्षिक सादर केले. त्यासाठी एक महाराष्ट्र सिग्नल कंपनी, एन.सी. सी.पुणेचे ऑफिसर कमांडिंग कर्नल संजय जोशी व प्राचार्य डॉ.एस.बी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मेजर ए. बी. कानवडे, रामकृष्ण आंधळे, योगाप्रशिक्षक डॉ.महादेव घुले, बाळशिराम नेहरे गुरुजी यांनी विशेष परिश्रम घेतले.

याप्रसंगी डॉ.महादेव घुले यांचे 'योगसाधनेचे महत्व' या विषयावर प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासाठी व्याख्यान व योग प्रात्याक्षिकाचे आयोजन करण्यात आले. यावेळी बोलताना डॉ.घुले यांनी भारतातील योग परंपरेचा आढावा घेताना महर्षी पतंजलीच्या योगविषयक कार्याची माहिती दिली. योगाभ्यास हा मुल्याशिक्षणासाठी, शरीर स्वास्थ्यासाठी, रोग प्रतिबंधासाठी आणि सामाजिक स्वास्थ्यासाठी आवश्यक असल्याचे सांगितले. निरोगी जीवनासाठी योगाचा प्रचार व प्रसार व्हावा म्हणून या जागतिक योगादिनाचे उदिष्ट असल्याचे ते म्हणाले. महाविद्यालयातील सर्वच प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमात सहभाग घेतला.



**राजगुरुनगर : येथे जागतिक योग दिनानिमित्ताने हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व महात्मा गांधी विद्यालयाच्या सुमारे १०० सिग्नल व एयर एनसीसी विद्यार्थ्यांनी योगप्रात्यक्षिक सादर केली.**

खेड तालुक्यात अनेक शाळांमध्ये विद्यार्थ्यांना जागतिक योग दिनानिमित्ताने योगप्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले होते. मात्र (दि.२१) च्या रात्री झालेल्या पावसामुळे या शिबिराचे नियोजन बदलण्यात आले. शाळांच्या मैदानात जास्त पाऊस पडल्याने पाणी साचल्याने तेथे शिबिरे झाली नाहीत. अनेक शाळांमध्ये सर्व मुलांना एकत्रित न करता ज्यात्या वर्गात शिक्षकांनी योग प्रशिक्षण विद्यार्थ्यांना दिले. खेड तालुक्यात शाळा, महाविद्यालये. शासकीय कार्यालयात योग दिवस साजरा करण्यात आला.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख